CMYK

जलसंवर्धनासाठी जलताराची आजची कृती, उद्याचं भवितव्य सुरक्षित करेल : जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. >> पान 2

गोंडवाना विद्यापीठाने व्यवसायाभिमुख शिक्षणावर भर द्यावा >> पान 3

वाशीम जिल्ह्यातील सर्वच ग्रामपंचायतींची होणार तपासणी >> पान 4

**सुविचार**

आत्म-परिक्षण करा.



# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 284 ■ बुधवार, दि. 25 जून 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




आपल्या गावात प्रयोग करता येत नाही याचं खूप वाईट वाटतं - संकर्षण कऱ्हाडे

आतील पान

# रेल्वे भाडेवाढ, १ जुलैपासून होणार अंमलबजावणी

**नवी दिल्ली : तुम्ही जर रेल्वेनं प्रवास करत असाल तर तुमच्यासाठी महत्त्वाची अपडेट आहे. पुढील महिन्यात रेल्वे प्रवाशांना एक्स्प्रेस गाड्यांमधून प्रवास करायचा असेल तर अधिक पैसे मोजावे लागू शकतात. भारतीय रेल्वेनं करोनाच्या काळानंतर पहिल्यांदा रेल्वेच्या प्रवास भाड्यात वाढ करण्याचा निर्णय घेतल्याचं वृत्त द इकोनॉमिक टाइम्सनं सूत्रांच्या आधारे दिलं आहे. रेल्वे प्रवास भाड्यात किरकोळ वाढ होणार असून ती १ जुलैपासून लागू केली जाणार असल्याची माहिती आहे.**


## एस मध्ये १000 किमी प्रवास करण्यासाठी २0 रुपये जास्त खर्च येईल

द इकोनॉमिक टाइम्सनं दिलेल्या वृत्तानुसार नॉन एसी मेल आणि एक्स्प्रेस ट्रेनच्या प्रवास भाड्यात १ पैसे प्रति किलोमीटर वाढ होणार आहे. एसी क्लाससाठी प्रवास भाड्यात २ पैसे प्रति किलोमीटर वाढ होणार आहे. मात्र, ५०० किलोमीटरपर्यंतच्या उपनगरीय तिकीट किंवा सेकंड क्लासच्या प्रवास भाड्यात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. ५०० किलोमीटरपेक्षा अधिक अंतराच्या प्रवासासाठी दरवाढ लागू असेल. मासिक सीझन पासच्या तिकीटामध्ये वाढ करण्यात आलेली नाही.

१ जुलैपासून तिकीट दर कसे बदलणार?

उपनगरीय प्रवास भाड्यात कोणतीही वाढ नाही.

मासिक सीझन तिकीटाच्या दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



सेकंड क्लास प्रवासासाठी ५०० किलोमीटरपर्यंत प्रवास भाडेवाढ लागू होणार नाही.

सेकंड क्लास ५०० किलोमीटर पेक्षा जास्त अंतराच्या प्रवासासाठी प्रति किलोमीटर ०.५० पैसे भाढेवाढ लागू होईल.

मेल आणि एक्सप्रेस नॉन एसीप्रवास भाडं १ पैसे प्रति किलोमीटर वाढेल.

एसी मधील प्रवासभाडं २ पैसे प्रति किलोमीटरनं वाढेल.

तात्काळ तिकीट बुकिंगसाठी आधार प्रमाणीकरण आवश्यक

भारतीय रेल्वेनं तात्काळ तिकीट बुकिंगसाठी आधार प्रमाणीकरण करणं आवश्यक केलं आहे. त्यानुसार १ जुलै २०२५ पासून आधार प्रमाणीकरण पूर्ण >> पान ३

# शक्तिपीठ महामार्गास कॅबिनेटची मंजुरी

**मुंबई/प्रतिनिधी :राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाची कॅबिनेट बैठक आज मंत्रालयात संपन्न झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आजच्या बैठकीत शक्तिपीठ महामार्गास मंजुरी देण्यात आली आहे. राज्यातील १८ तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या या महामार्गास अनेक जिल्ह्यात शेतकऱ्यांचा विरोध असतानाही मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आल्याने शेतकरी, आंदोलक आक्रमक होतील, असे दिसून येते. तसेच, राज्यात वस्तू व सेवा कर विधेयक आणण्याचा निर्णयही या बैठकी घेण्यात आला आहे.**

- महाराष्ट्र जीएसटी कायद्यात सुधारणा
- मंत्रिमंडळ बैठकीत ८ मोठे निर्णय

महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग - पवनार (जि.वर्धा) ते पत्रादेवी ( जि. सिंधुदुर्ग) या महाराष्ट्र गोवा सरहद्द शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गास मान्यता. राज्यातील साडेतीन शक्तिपीठ , दोन ज्योतिर्लिंग आणि पंढरपूर अंबेजोगाई सहित १८ तीर्थक्षेत्रांना जोडणारा शक्तिपीठ महामार्ग. प्रकल्प महामंडळामार्फत राबवणार, प्रकल्पाच्या आखणीस तसेच भूसंपादनासाठी २० हजार कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता. (सार्वजनिक बांधकाम विभाग)

आदिवासी शासकीय वसतीगृहांमधील विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य खरेदी भत्ता व आहार भत्त्यामध्ये वाढ. दरमहा मिळणाऱ्या निर्वाह >> पान ३



## महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघात अवघ्या ५ महिन्यात तब्बल ८ टक्के मतदारांमध्ये वाढ



### काँग्रेस नेते राहुल गांधींचा गंभीर आरोप

**मुंबई/प्रतिनिधी :** काँग्रेस नेते आणि लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधींनी पुन्हा एकदा महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांच्या निकालावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलेय. राहुल गांधी यांनी २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचा आरोप करत, गेल्या निवडणुकीच्या वेळी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी स्वतःच्या मतदारसंघातील मतदार यादीत फेरफार केल्याचा आरोप केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतःच्या मतदारसंघातील मतदार यादीत अवघ्या ५ महिन्यांत तब्बल ८% वाढ केली असल्याचा गंभीर आरोप राहुल गांधींनी केला आहे.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी स्वतःच्या मतदारसंघातील मतदार यादीत गेल्या ५ महिन्यांत तब्बल ८% वाढ झाली असल्याचा गंभीर आरोप केला आहे. राहुल गांधींनी एक्स या समाज मध्यमावर पोस्ट करत हे आरोप केले आहे. तर काही बूथवर २०-५०% वाढ झाली आहे. सोबतच इडज नी अज्ञात व्यक्तींनी मतदान केल्याचेही यात म्हटलं आहे. दरम्यान, निवडणूक प्रक्रियेत गडबड घोटाळा होत असतानाही निवडणूक आयोग गप्प का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. >> पान ३

## शक्तिपीठवरुन बीडमध्ये घमासान, मोजणीसाठी आलेले अधिकारी-पोलिसांकडून शेतकऱ्यांना अरेरावी, शेकापचा आरोप

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** वर्धा ते गोवा दरम्यान होणाऱ्या शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली असली तरी त्याला ठिकठिकाणी विरोध होत असल्याचं चित्र आहे. शक्तिपीठ महामार्गासाठी आम्ही जमीन देणार नाही अशी भूमिका बीडमधील शेतकऱ्यांनी घेतल्याचं दिसून आलं. दरम्यान, अंबाजोगाईमध्ये मोजणीसाठी आलेले अधिकारी आणि पोलिसांनी शेतकऱ्यांना अरेरावी केल्याचा आरोप शेतकरी कामगार पक्षाने केला.

बीडच्या अंबाजोगाई तालुक्यात आज शक्तिपीठ महामार्गाच्या जमीन मोजणीसाठी अधिकारी आले होते. त्यावेळी प्रशासकीय अधिकारी आणि पोलिसांकडून शेतकऱ्यांना अरेरावी करण्यात आल्याचा आरोप शेतकरी कामगार पक्षाकडून करण्यात आला.

## वारीसंदर्भात केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावर अबू आझमी यांनी मागितली माफी

**मुंबई/प्रतिनिधी :** वारी संदर्भात केलेल्या वादग्रस्त वक्तव्यानंतर, अबू आझमी यांना आपली चूक लक्षात आली आहे. ''माझ्या वक्तव्यामुळे वारकरी संप्रदायाच्या भावनांना ठेच पोहचली असेल तर मी माझे शब्द मागे घेतो. मी माफी मागतो.'' असे ट्विट करत त्यांनी आपला माफीनामा जाहीर केला आहे.

महाराष्ट्रातील समाजवादी पक्षाचे अध्यक्ष आणि आमदार अबू आझमी यांनी वारीसंदर्भात वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्यामुळे आझमी यांच्यावर मोठ्या प्रमाणावर टीका होऊ लागली. भाजपसह इतर पक्षांनी अबू आझमी यांच्या वक्तव्याचा निषेध केला. तसेच, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी अबू आझमींना >> पान ३

## धाराशिवमध्ये सोयाबीन पेरलं पण साधा अंकूरही फुटेना

दैनिक आपला विदर्भ

**धाराशिव/प्रतिनिधी :** महाबीजचे बियाणे म्हणजे शेतकऱ्याला विश्र्वासाची हमी असते. मात्र धाराशिव जिल्ह्यात महाबीजच्या विश्र्वासाला तडा गेल्याच पाहायला मिळते. सोयाबीन बियाणे न उगवल्याच्या तक्रारी कृषी विभागाकडे प्राप्त झाल्यात त्यामध्ये जवळपास ९०% तक्रारी महाबीजच्या आहेत. शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर कृषी विभागाकडून पंचनामा करण्यात आला त्यामध्ये बियाण्यात दोष असल्याचा आढळल्याच कृषी विभागाकडून सांगण्यात आले. जिल्हाभरात अनेक शेतकऱ्यांचे बियाण उगवलेलं नाही त्यामुळे दुबार पेरणीचा संकट ओढवलं आहे.

धाराशिव जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये शेतकऱ्यांनी खरीप हंगामासाठी सोयाबीन पेरणी केली. पेरणीनंतर आठवड्यानंतरही अंकुर न फुटल्यामुळे शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे तक्रारी नोंदवल्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत कृषी विभागाने विविध गावांमध्ये पंचनामे सुरू केले. पंचनाम्याच्या अहवालातून महाबीजच्या

### महाबीजचं बियाणं बोगस निघालं, शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचं संकट

बियाण्यांमध्ये दोष असल्याचं स्पष्ट झालं आहे. या प्रकारामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागत आहे. अनेकांनी कर्ज काढून बियाणं खरेदी केलं होतं. मात्र बियाणं उगवलंच नाही, त्यामुळे दुबार पेरणी करण्याची वेळ आली आहे. यामुळे मजुरी, बियाणं, खते अशा सर्व गोष्टींवर दुहेरी खर्च होणार आहे. शेतकऱ्यांच्या मते, महाबीजसारख्या सरकारी संस्थेच्या बियाण्यावर विश्र्वास ठेवला तरी असा फसवणुकीचा अनुभव येतोय.

धाराशिव जिल्ह्यातील धाराशिव, तुळजापूर, लोहारा आणि उमरगा तालुक्यात साधारण २५ ते ३० तक्रारी या बियाणं उगवलं नसल्याच्या आल्या आहेत. त्यात ९०% बियाणं हे महाबीजच आहे. या तक्रारींची पाहणी केल्यानंतर ही बियाणं सदोष असल्याचं समोर आले.

## एअर इंडियाने मध्यपूर्व, युरोप व अमेरिकेतील उड्डाणे तात्काळ बंद केली

नवी दिल्ली : मध्यपूर्वेतील वाढत्या तणावामुळे एअर इंडियाने मोठा निर्णय घेत या भागातील आपली सर्व आंतरराष्ट्रीय उड्डाणे तात्काळ बंद केली आहेत. कंपनीने मध्यपूर्व, उत्तर अमेरिकेचा पूर्व किनारा आणि युरोप या सर्व मार्गांवरील सेवा पुढील सूचना मिळेपर्यंत थांबवल्या आहेत. यामुळे व्यावसायिक हवाई वाहतूक पूर्णपणे कोलमडली आहे. दुबई, दोहा आणि अबू धाबी सारख्या मोठ्या हब्सवर याचा परिणाम झाला आहे.

एअर इंडियाच्या प्रवक्त्याने सांगितले, मध्यपूर्वेतील विकसनशील परिस्थितीमुळे एअर इंडियाने या प्रदेशातील तसेच उत्तर अमेरिका व युरोपच्या पूर्व किनाऱ्यावरील सर्व कामकाज तात्काळ बंद केले आहे. आमची उत्तर अमेरिकेहून भारतात येणारी विमाने त्यांच्या मूळ ठिकाणी परत जात आहेत तर इतर विमाने भारतात परत आणली जात आहेत किंवा बंद हवाई क्षेत्रापासून दूर नेली जात आहेत. कंपनीने प्रवाशांकडून माफी मागितली आहे आणि म्हटले आहे, या व्यत्ययामुळे प्रभावित होणाऱ्या सर्व प्रवाशांची आम्ही समजूतदारपणे माफी मागतो कारण ही परिस्थिती विमान कंपनीच्या नियंत्रणाबाहेरची आहे. एअर इंडिया आपल्या बाह्य सुरक्षा सल्लागारांशी सतत सल्लामसलत करत आहे आणि वाढत्या परिस्थितीवर दक्षतेने लक्ष ठेवत आहे.

## अजित पवारांच्या खात्याकडे लक्ष ठेवा; निधी कुठे वितरित होतो याची माहिती घ्या

### एकनाथ शिंदेंचे शिवसेनेच्या मंत्र्यांना आदेश

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अजित पवार निधी देत नाही असा नाराजीचा सूर लावलेल्या शिवसेनेच्या मंत्र्यांना एकनाथ शिंदे यांनी आदेश दिला आहे. अजित पवारांच्या खात्याकडे मोठा निधी आहे, त्यावर लक्ष ठेवा. तो निधी कुठे वितरित होतो याची माहिती घ्या असा आदेश एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या मंत्र्यांना दिल्याची माहिती आहे. कॅबिनेटच्या बैठकीनंतर एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या मंत्र्यांची वेगळी बैठक घेतली. त्यामध्ये निधी वाटपावरुन शिंदेंच्या मंत्र्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्याची माहिती आहे.

महायुती सरकारच्या तीन घटक पक्षांमध्ये निधी वाटपासंबंधी सातत्याने धुसफूस सुरू असल्याचं दिसून येतंय. त्यातही शिंदेंच्या शिवसेनेच्या मंत्र्यांनी अर्थमंत्री अजित पवार यांच्याविषयी अनेकदा नाराजी व्यक्त केली आहे. त्याच पार्श्र्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या मंत्र्यांची स्वतंत्र बैठक घेतली.

राज्यातील निधी वाटपावरुन एकनाथ शिंदे आक्रमक झाल्याचं दिसून आलं. अजित पवारांच्या खात्यावर बारकाईनं लक्ष ठेवा असा आदेश त्यांनी मंत्र्यांना दिला.



अजित पवारांच्या खात्यात १४-१४ हजार कोटींचे दोन निधी आहेत. त्यावर लक्ष ठेवल् पाहिजे. हा निधी कुठे वितरीत होत आहे यांची माहिती आपल्याला मिळाली पाहिजे असं एकनाथ शिंदे म्हणाले.

जे आपल्या हक्काचं आहे ते घेतलंच पाहिजे असा आदेश एकनाथ शिंदे यांनी मंत्र्यांना दिला. त्यामुळे आता अजित पवारांच्या अर्थखात्यावर शिवसेनेचा वॉच असेल अशी चर्चा सुरू आहे.

निधी वाटपाच्या मुद्द्यावरून मंत्र्यांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी अजित पवारांची भेट घेतली. त्या आधी शिंदेंचे मंत्री उदय सामंत यांनीही अजित पवारांची भेट घेतली होती. >> पान ३

## पंढरीला निघालेल्या भोळ्याभाबड्या वारकऱ्यांना फसवलं

### विठुरायाच्या दर्शनाचे बोगस पास विकले, पोलिसांचा तपास सुरु

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** आषाढी एकादशीनिमित्त लाखो वारकरी पंढरपूरच्या दिशेने विठ्ठलनामाचा गजर करत वाटचाल करत असताना, काही फसवणूक करणाऱ्या टोळ्यांनी या भक्तिभावाला काळिमा फासणारा प्रकार घडवला आहे. थेट ज्ञानेश्र्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यात सहभागी असलेल्या काही भाविकांना मंदिर प्रवेशासाठी बनावट 'टोकन दर्शन' पास विकल्याची घटना समोर आली आहे.



ज्ञानेश्र्वर महाराज पालखी सोहळ्यात चालत असलेल्या काही भाविकांना तुम्हाला देवाच्या टोकन दर्शनाचे पास १०० रुपयात देतो, असे सांगून सासवड परिसरात जुन्या पासावर हे नवीन डुप्लिकेट पास बनवून दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. मात्र जेव्हा हे भाविक आज विठ्ठल मंदिरात दर्शनासाठी पोहोचले, >> पान ३

CMYK

# आणीबाणीमुळे लोकांना लोकशाहीचे महत्व कळले

आज २५ जून, भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू करण्याच्या घटनेला आज ५० वर्ष पूर्ण झाली. बरोबर ५० वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २५ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी लागू झाली. १२ जून १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द करून त्यांना पुढील सहा वर्ष निवडणूक लढवण्यास बंदी घातली. राजनारायण यांनी इंदिरा गांधी यांनी १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत गैरव्यवहार केला असा आरोप करून खटला दाखल केला होता. या खटल्याच्या निकाल १२ जूनला लागला. या निकालानंतर अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द झाल्याने त्यांनी पंतप्रधानपद सोडावे अशी मागणी होऊ लागली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. परंतु सर्वोच्च न्यायालयाचे सुट्टीच्या काळातील न्यायाधीश व्ही. आर कृष्ण अय्यर यांनी उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती देण्यास नकार दिला मात्र सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत इंदिराजींना पंतप्रधान पदावर राहण्यास मुभा दिली. हा निर्णय आल्यानंतर पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी स्वतःची सत्ता टिकवण्यासाठी २५ जून १९७५ च्या रात्री देशात आणीबाणी लागू केली. आणीबाणीच्या मसुद्यावर तत्कालीन राष्ट्रपती फकरुद्दीन अली अहमद यांनी रात्री बारा वाजता स्वाक्षरी केली. आणीबाणी लागू झाल्यानंतर इंदिरा गांधी यांच्या हातात अनिर्बंध सत्ता आली. माध्यमांची मुस्कटदाबी सुरू झाली. जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जॉर्ज फर्नांडिस, चौधरी चरणसिंग, मोरारजी देसाई, नानाजी देशमुख, मधु दंडवते, रामकृष्ण हेगडे, सिखंदर बख्त, लालूप्रसाद यादव, मुलायमसिंग यादव, रामविलास पासवान यांच्यासह अनेक मोठे नेते तसेच पत्रकारांना मिसा कायद्याखाली तुरुंगात डांबण्यात आले. आणीबाणीच्या २१ महिन्यांच्या कालावधीत ११ लाख लोकांना तुरुंगवास भोगावा लागला. सक्तीची नसबंदी आणि झोपडपट्टी हटवून शहरे सुशोभित करण्याच्या मोहिमेत लोकांवर जुलूम जबरदस्ती करण्यात येऊ लागले. त्यामुळे देशभर भीतीचे आणि संशयाचे वातावरण निर्माण झाले. सुरवातीला दहशतीत असणारे नागरिक या अन्यायाविरुद्ध नंतर रस्त्यांवर उतरू लागले. सामाजिक कार्यकर्ते, नेते, अभिनेते, कलाकार, बुद्धीवादी लोक, साहित्यिक असे सारे लोक आणीबाणीच्या विरोधात एकवटले. सर्व स्तरातून आणीबाणीला विरोध होऊ लागला. संपूर्ण देश आणीबाणीच्या विरोधात एकवटल्याचे पाहून इंदिरा गांधी यांनी आणीबाणी सैल करून १९७७ साली लोकसभेच्या निवडणुका घेतल्या. या निवडणुकीत इंदिरा गांधी, संजय गांधी यांचा दारुण पराभव झाला. विरोधी पक्ष असलेल्या जनता पार्टीचे सरकार आले. मोरारजी देसाई हे पंतप्रधान बनले. पण या सरकारमध्ये कमालीचा अंतर्विरोध होता. हाती आलेली सत्ता या विरोधी पक्षांना टिकवता आली नाही. पुढील निवडणुकीत इंदिरा गांधी पुन्हा पंतप्रधान बनल्या. आणीबाणी ही स्वतंत्र भारताच्या इतिहासातील काळे पर्व म्हणून ओळखली जाते. ४९ वर्षांपूर्वी घडलेल्या या दिवसातील घडामोडींनी देशाला लोकशाहिवरील श्रध्येचे महत्त्व काय आहे याची जाणीव करून दिली. भारताच्या इतिहासातील या घटनेची आठवण म्हणजे कोणाला चांगले वाईट ठरवणे नसून लोकशाहीची ताकद व सामर्थ्य यांचे स्मरण होय.

# जलसंवर्धनासाठी जलताराची आजची कृती, उद्याचं भवितव्य सुरक्षित करेल : जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस.

## –वत्सगुल्म भूजल पुनर्भरण स्पर्धा – जिल्ह्यात जनुना खुर्द गावाने पटकाविला प्रथम क्रमांक : बक्षीस वितरण समारंभ उत्साहात

**दैनिक आपला विदर्भ**

**वाशीम/प्रतिनिधी :** पाण्याचा एक थेंब वाचवणं म्हणजे भविष्याची एक आशा जपणं! वाढती जलटंचाई, कोरडी होत चाललेली भूजल पातळी आणि बदलत्या हवामानाच्या संकटात वाशिम जिल्ह्याने एक सकारात्मक आणि सामूहिक कृतीची दिशा स्वीकारली ती म्हणजे वत्सगुल्म भूजल पुनर्भरण स्पर्धा ही एक चळवळ ठरली श्रमदानातून साकारलेली, लोकसहभागातून उभी राहिलेली आणि पर्यावरणप्रेमातून वाढलेली. गावकऱ्यांनी हातात फावडे घेतले आणि जमिनीला दिला नवजीवनाचा श्वास. तिथं केवळ जलतारे तयार झाले नाहीत, तर निर्माण झाली उमेद, एकजूट आणि जलजागरूकतेची नवी ओळख.

जिल्ह्यातील सर्वच ग्रामपंचायतींनी दाखवलेला उत्साह, बांधिलकी आणि जलप्रेम पाहून मन भरून येते. वत्सगुल्म भूजल पुनर्भरण स्पर्धा ही केवळ प्रशासन पुरस्कृत स्पर्धा नाही तर ही लोकशक्तीचा जागर आहे. गावकऱ्यांनी जेव्हा जलतारे खोदले, तेव्हा त्यांनी केवळ मातीच हलवली नाही तर भविष्यासाठी आशा रुजवली. ही चळवळ प्रशासन, स्वयंसेवी संस्था आणि सामान्य नागरिक यांना एका ध्येयाने एकत्र आणणारी ठरली आहे.असे प्रतिपादन जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी केले.

भूजल संवर्धनासाठी जिल्हा प्रशासनातर्फे राबविण्यात आलेल्या वत्सगुल्म भूजल पुनर्भरण स्पर्धा चा बक्षीस वितरण समारंभ वाटाणे लॉन, वाशीम येथे २१ जू रोजी उत्साहात पार पडला.यावेळी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस. उपस्थित होत्या.प्रमुख अतिथी म्हणून शिक्षक आमदार किरणराव सरनाईक, आमदार श्याम खोडे, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, परिविक्षाधीन जिल्हाधिकारी आकाश वर्मा,



निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपजिल्हाधिकारी कैलास देवरे, प्रकल्प संचालक अनिसा महाबळे , जलताराचे जनक डॉ. पुरुषोत्तम वायाळ, समता फाउंडेशनचे उत्तमचंद बगडिया, तिफनचे फाउंडेशनचे श्री. देशमुख, समाजसेवक मारशेटवार गुरुजी, वेदमुथा, कृषी उत्पन्न बाजार समिती वाशिमचे माधवराव काकडे, मानोरा येथील भुजंगराव राठोड, कारंजा येथील भालचंद्र जाधव, ब्रह्मकुमारी स्वाती दिदी, आर्ट ऑफ लिव्हिंगचे संचालक डॉ.हरिष बाहेती, डॉ.सरोज बाहेती, सुभाषराव नानोटे, माजी नगराध्यक्ष अशोक हेडा, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुभाष चौधरी , सामाजिक कार्यकर्ते राजु पाटील राजे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक जनुना खुर्द, द्वितीय क्रमांक मालेगाव तालुक्यातील कोळदरा तर तृतीय क्रमांक रिसोड तालुक्यातील वाघी खुर्द या गावांना मिळाला.या कार्यक्रमाची सुरुवात अहमदाबाद येथे विमान दुर्घटनेमध्ये मृत्युमुखी पडलेल्या बांधवांना व अरण्यरुषी पद्मश्री मारुती चितमपल्ली यांना श्रद्धांजली अर्पण करून झाली. त्यानंतर दीपप्रज्वलन आणि मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. हरीष बाहेती यांनी केले. वाशिम जिल्हा ॲसपिरेशनलमधून इन्सपिरेशनलकडे वाटचाल करत आहे. जलसाक्षरता हीच खरी दिशा आहे, असे त्यांनी सांगितले. जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस.पुढे म्हणाल्या , ॲसपिरेशनल टू इन्सपिरेशनल ही संकल्पना कृतीतून उमटावी आणि वाशिम जिल्हा त्या दिशेने चालला आहे, याचा मला अभिमान आहे. या कामात योगदान देणाऱ्या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन जिल्हाधिकाऱ्यांनी याप्रसंगी व्यक्त केले.स्पर्धेअंतर्गत वाशीम जिल्ह्यातील सहा तालुक्यांतील २४ गावांची निवड करून१४ जून रोजी परीक्षण करण्यात आले होते.त्यात तालुकास्तरीय स्पर्धेत वाशिम तालुक्यातील तामसाळा ग्रामपंचायतीने १४०० जलताऱ्यांची निर्मिती करत प्रथम क्रमांक, कोंडाळा झामरे द्वितीय, तर तृतीय क्रमांक नागठाणा ग्रामपंचायतीने तृतीय क्रमांक पटकावला.रिसोड तालुक्यातील स्पर्धेत प्रथम क्रमांक कंकरवाडी, द्वितीय क्रमांक घोटा, तृतीय गोहगाव, मानोरा तालुक्यात प्रथम क्रमांक वसंत नगर, व्दितीय क्रमांक ढोणी , तृतीय क्रमांक तळप बु , मालेगाव तालुक्यात प्रथम क्रमांक ईरळा, व्दितीय क्रमांक आमखेडा, तृतीय क्रमांक जऊळका मंगरूळपीर तालुक्यात प्रथम क्रमांक नागी, व्दितीय क्रमांक अंबापूर, तृतीय क्रमांक गोलवाडी कारंजा तालुक्यात प्रथम क्रमांक गायवळ, व्दितीय क्रमांक लाडेगाव, तृतीय क्रमांक मुरब्बी,

तर कम्पो रिचार्ज पिट स्पर्धेतील १२ शेतकऱ्यांना लकी ड्रॉद्वारे स्मार्ट पेरणी यंत्रांचे वितरण करण्यात आले.उपविभागीय कृषी अधिकारी संतोष वाळके यांनी यंत्र वितरणाच्या पार्श्वभूमीची माहिती देत सांगितले की, शाश्वत शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाची जोड आवश्यक आहे. स्मार्ट पेरणी यंत्र शेतकऱ्यांचे श्रम आणि पाणी वाचवते.कार्यक्रमात अविनाश मारशेटवार व डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनीही आपले मनोगत व्यक्त करत,गावकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग हीच या स्पर्धेची खरी यशकथा आहे, असे सांगितले. या उपक्रमाचे प्रायोजक म्हणून आर्ट ऑफ लिव्हिंग, बीजेएस, पाणी फाउंडेशन, रेडिओ वत्सगुल्म, समता फाउंडेशन, श्री फाउंडेशन, तिफन फाउंडेशन, सर्वधर्म मित्र मंडळ,स्वामी विवेकानंद शिक्षण व व्यायाम प्रसारक मंडळ, माहेश्वरी संघटना व ब्रदर्स संघटना आदींचे योगदान लाभले.

यादरम्यान जियो टॅगींग मध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या वाटर हिरोजचांही प्रातिनिधिक स्वरूपात यथोचित सन्मान करण्यात आला. वत्सगुल्म स्पर्धा ही केवळ स्पर्धा न राहता जिल्ह्यातील जलचळवळीचे प्रबळ उदाहरण बनली आहे, असे मत अनेकांनी यावेळी व्यक्त केले.सूत्रसंचालन निलेश सोमाणी, इरफान सय्यद व डॉ. काळे यांनी केले.कार्यक्रमाला अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवी संस्था व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.आभार उपजिल्हाधिकारी कैलास देवरे व निलेश सोमाणी यांनी मानले.

# युद्धबंदीची घोषणा झाल्यानंतरही इराणचा इस्त्रायलवर मिसाईल हल्ला; ६ जण ठार, पुन्हा युद्ध भडकणार?

तेहरान : इराण आणि इस्त्रायल यांच्यात मागील १२ दिवसांपासून सुरु असलेल्या युद्धानंतर शस्त्रसंधीची घोषणा करण्यात आली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्यस्थी केल्यानंतर दोन्ही देश शस्त्रसंधीसाठी तयार झाल्याचा दावा आहे. मात्र युद्धबंदी जाहीर झाल्यानंतरही इराणकडून सतत बॉम्बहल्ला केला जात आहे. इस्त्रायलच्या सुरक्षा विभागाने सांगितलं आहे की, इराणने एका तासाच्या आत तीन वेळा मिसाईल हल्ला केला आहे, ज्यामध्ये ६ जणांचा मृत्यू झाला आहे. तेल अवीवमध्ये सतत सायरन वाजत असून, लोक सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करत आहेत. अशा परिस्थितीत खरंच शस्त्रसंधी झाली आहे का? अशी विचारणा होत आहे.

इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी ताज्या हल्ल्याबद्दल बोलताना सांगितलं की, आमचं शक्तिशाली लष्कर अखेरच्या मि निटापर्यंत इस्त्रायलला त्याच्या हल्ल्याची शिक्षा देईल. ते म्हणाले की, ''सर्व इराणी नागरिकांसह मी आपल्या शूर सशस्त्र दलांचे आभार मानतो जे आपल्या रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत देशाची सुरक्षा करण्यास तयार असतात, ज्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत शत्रूला उत्तर दिलं''. दरम्यान इराणने शस्त्रसंधीची घोषणा झाल्यानंतर पुन्हा एकदा हल्ला केला असल्याने युद्ध भडकण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

१३ जूनपासून सुरू झालेल्या इस्रायलविरुद्धच्या युद्धात इराणचं म ोठं नुकसान झालं आहे. अमेरिकेने त्यांच्या तीन प्रमुख अणुकेंद्र फोर्डो, नतान्झ आणि इस्फहानवर बंकर बस्टर बॉम्बने हल्ला केला आहे. इस्रायली हल्ल्यात इराणी रिव्होल्यूशनरी गार्ड्सचे प्रमुख हुसेन सलामी यांच्यासह अनेक उच्च लष्करी कमांडर आणि अणुशास्त्रज्ञांचा मृत्यू झाला आहे. याशिवाय, इराणमध्ये सुमारे एक हजार लोकांचा मृत्यू झाला आहे. या युद्धात इराणच्या पायाभूत सुविधांचंही मोठं नुकसान झालं आहे.

अमेरिकेने युद्धात इस्त्रायलला म दत केली असून, इराणमधील सर्वात महत्त्वाच्या अणुऊर्जा केंद्र फोर्डोसह तीन ठिकाणी बॉम्बहल्ला केला, ज्याम ध्ये अणुऊर्जा केंद्राचे बरेच नुकसान होण्याची भीती आहे.

# महानिर्मिती राज्यात उभारणार १०७१ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प -मुख्यमंत्री फडणवीस

## राज्यातील तीन लाख शेतकऱ्यांना लाभ होणार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करून कार्बन उत्सर्जन घटवून शेतक–यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित वीजपुरवठा देवून शेतीची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी शासन विविध योजना राबवित आहे. राज्यात शाश्वत विकासास चालना देण्यासाठी महानिर्मिती तर्फे १,०७१ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प २.० अंतर्गत लवकरच कार्यान्वित होणार आहेत.या प्रकल्पांमुळे राज्यातील तीन लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

महानिर्मिती ही म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी मर्यादित या कंपनीची संपूर्ण मालकीची उपकंपनी असून, सुमारे १३,८८० मेगावॅट क्षमतेसह भारतातील सर्वात मोठ्या राज्य–नियंत्रित विद्युत उत्पादकांपैकी एक आहे. नॅशनल थर्मल पॉवर कंपनी नंतर () ही देशातील दुसऱ्या क्रमांकाची राज्य मालकीची जनरेशन कंपनी आहे. औष्णिक, वायू, जल विद्युत आणि सौर असे ऊर्जा उत्पादन क्षेत्रात वैविध्य असलेली महानिर्मिती ही कंपनी नवीकरणीय ऊर्जेचे प्रकल्प सुरू करत आहे, ज्यामुळे वीज ग्राहकांना कमी दरात वीजपुरवठा करत कार्बन उत्सर्जनात घट होण्यास मदत होणार आहे.

द रॉकफेलर फाउंडेशन , इकीया फांउडेशन आणि बेझॉज अर्थ फंड यांच्या सहकार्याने स्थापन झालेली जीईएपीपी इंडिया (ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेट) ही संस्था विकसनशील देशांमध्ये न्याय्य, समतोल व वेगवान हरित ऊर्जेसाठी मदत करते. जीईएपीपी इंडिया ही जीईएपीपी एलएलसीची भारतीय शाखा असून, भारतात विशेषतः वितरणक्षम ऊर्जेसाठी उपयुक्त उपक्रमांची अंमलबजावणी करत आहे.

पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करून कार्बन उत्सर्जन घटवून शेतक–यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित वीजपुरवठा देवून शेतीची उत्पादनक्षमता वाढविणे हे राज्य शासनाचे ध्येय आहे.कृषी ग्राहकांच्या सेवेखर्चात कपात करून शाश्वत ऊर्जेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची अत्यंत महत्वकांक्षी असलेली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० आहे ही योजना वितरित पद्धतीने नवीकरणीय ऊर्जा वापरून कृषी वापरासाठी सौर प्रकल्प जोडण्यात येतात. सन २०२५ पर्यंत सुमारे ३०% फीडरचे सोलरायझेशनचे उद्दिष्ट मिशन २०२५ म्हणून निश्चित केले आहे, ज्यामध्ये शेतक–यांना दिवसा वीज देण्यासाठी ०.५ मेगावॅट ते २५ मेगावॅट क्षमतेचा कृषी भार असलेल्या वितरण उपकेंद्रापासून ५ – १० किमी परिघात विकेंद्रित सौर प्रकल्प उभारले जातात.

जीईपीपी इंडिया हा प्रकल्प प्रभावीपणे राबवण्यासाठी प्रकल्प मॉनिटरिंग युनिट () सुविधा आणि एक डिजिटल प्लॅटफॉर्म उपलब्ध करत आहे, माहितीचे संकलन, या प्रकल्पाची सद्यस्थिती आणि प्रकल्पांचे सुलभ व्यवस्थापन शक्य होईल.जीईपीपीच्या तंत्रज्ञान आणि नवकल्पनांचा उपयोग करून मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प २.० ची प्रभावी अंमलबजावणी करणे.महाराष्ट्रात शाश्वत विकासास चालना देणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्येश आहे.



हे सौर ऊर्जा प्रकल्प वेळेत पूर्ण करणे करता धोरणात्मक संयुक्त समिती स्थापन करण्यात येणार असून ही समिती मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेबाबत मार्गदर्शन करेल.

या समितीमध्ये सर्व सहभागधारक यांचा समावेश असणार आहे. जीईएपीपी इंडिया (ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅने व महानिर्मितीतर्फे सेंट्रल डॅश बोर्ड तयार करण्यात येणार असून यामार्फत जमीन संपादन ते प्रकल्प उभारणी प्रगती यांचे दैनंदिन तत्वावर अवलोकन करण्यात येणार आहे. सर्व भागधारकांसाठी या डॅश बोर्ड वापराबाबतचे प्रशिक्षण देण्यात येऊन हे सौर प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. या प्रकल्पाच्या माध्यमातून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होणार आहेत.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# गोंडवाना विद्यापीठाने व्यवसायाभिमुख शिक्षणावर भर द्यावा

## उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक पदव्या न देता रोजगाराभिमुख व व्यावसायिक प्रशिक्षण देणे अत्यंत गरजेचे आहे. गडचिरोलीसारख्या दुर्गम व आदिवासी भागात शिक्षणाच्या माध्यमातून प्रशिक्षण आणि रोजगारनिर्मिती यावर विशेष लक्ष द्यावे

गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाच्या सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) संदर्भात उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठकीत विद्यापीठाच्या विविध योजनांचे सादरीकरण करण्यात आले.

बैठकीत गोंडवाना विद्यापीठाच्या शैक्षणिक व भौतिक विकासासाठी सादर करण्यात आलेल्या डीपीआरमध्ये प्रादेशिक गरजांनुसार अभ्यासक्रमांची आखणी, नवीन इमारतींचा आराखडा, संशोधन केंद्रे, डिजिटल शिक्षणसुविधा यांचा समावेश करावा आणि स्थानिक संसाधनांवर आधारित उद्योगांना मदत करणारे संशोधन करावे आणि .आदिवासी व ग्रामीण विद्यार्थ्यांच्या जीवनमानात परिवर्तन घडवण्यासाठी विद्यापीठ पुढाकार घ्यावा असेही मंत्री



श्री.पाटील यांनी यावेळी सांगितले.

बैठकीत विभागाचे अपर मुख्य सचिव बी.वेणुगोपालरेड्डी, उपसचिव प्रताप लुबाळ,डॉ. प्रशांत बोकारे व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमध्ये उच्च शिक्षणातील गळतीचे प्रमाण कमी व्हावे,गडचिरोली जिल्ह्यातील तसेच विद्यापीठ परीक्षेत्रातील विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये, तो शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात यावा, संधीचा अभावामुळे पदवी प्राप्त करण्याचे स्वप्न अपूर्ण राहिलेल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ आपल्या गावात' हा नाविण्यपुर्ण उपक्रम राबविला जात आहे. विद्यार्थी उच्च शिक्षण संस्थेपर्यंत पोहोचू शकत नाही, तेव्हा शिक्षण संस्थानी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून त्यांच्यामध्ये शैक्षणिक जाणीव निर्माण करणे, शिक्षणाचा प्रचार-प्रसार करणे आवश्यक आहे. या उपक्रमांतर्गत गोंडवाना विद्यापीठ परिक्षेत्रातील अर्धवट शिक्षण सोडलेले, शाळाबाह्य व इतर अडचणीमुळे शिक्षण पूर्ण न करू शकलेल्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे व त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून रोजगाराभिमुख कौशल्यावर आधारित शिक्षण देणे हा गोंडवाना विद्यापीठाचा मानस आहे. असेही सादरीकरण करताना सांगितले

## पान १ वरून...

### रेल्वे भाडेवाढ, १ जुलैपासून

असलेल्या खात्यांमधून तात्काळ तिकीट बुक करता येणार आहे. रेल्वे मंत्रालयानं यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना १० जून २०२५ पासून जारी केल्या आहेत. तात्काळ तिकीट सर्वसामान्य प्रवाशांना मिळावं म्हणून हे बदल करण्यात आले आहेत. तात्काळ तिकीट बुकिंग सुरु होताच पहिल्या काही मिनिटांमध्ये ती संपून जायची. त्यामुळं सर्वसामान्य प्रवाशांना तिकीट मिळत नव्हतं. त्यामुळं रेल्वेकडून तात्काळ तिकीट बुकिंग प्रक्रियेत बदल करण्यात आला आहे. १ जुलैपासून तात्काळ तिकीट बुकिंगसाठी आधार प्रमाणीकरण आधारित ओटीपी पडताळणी आवश्यक असेल. १ जुलै २०२५ पासून तात्काळ तिकीट बुकिंग करण्यासाठी आधार प्रमाणीकरण लागू करण्याची घोषणा रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली होती. रेल्वेनं लागू केलेला हा नियम ऑनलाईन बुकिंग, काउंटर बुकिंग आणि एजंटद्वारे केल्या जाणाऱ्या बुकिंगसाठी लागू असेल.

### महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या स्वतःच्या मतदारसंघात, मतदार यादीत फक्त ५ महिन्यांत ८% वाढ झाली. तर काही बूथवर २० ते २५ % वाढ झाली. तसेच बीएलओंनी अज्ञात व्यक्तींनी मतदान केल्याचे नोंदवले. पडताळणी केलेल्या पत्त्याशिवाय हजारो मतदारांना उघड केले. असे सर्व सुरू असताना निवडणूक आयोग गप्प आहे की यात सहभागी आहे, असा सवालही त्यांनी केला आहे. शिवाय म्हणूनच आम्ही मशीन-रीडेबल डिजिटल मतदार यादी आणि सीसीटीव्ही फुटेज त्वरित प्रसिद्ध करण्याची मागणी करतोय. असेही राहुल गांधी यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

### शक्तिपीठ महामार्गास

व आहार भत्यात दुपटीने वाढ, वार्षिक शैक्षणिक साहित्य खरेदी भत्यात भरीव वाढ. (आदिवासी विकास विभाग) कोयना धरणाच्या पायथा विद्युतगृहाच्या प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता. (जलसंपदा विभाग) महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ मध्ये सुधारणा करून, आगामी अधिवेशनात महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विधेयक आणणार. (वित्त विभाग) सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांसाठी महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीतील तडजोडीसाठी सुधारणा विधेयक आणणार. (वित्त विभाग) वांद्रे पूर्व येथील उच्च न्यायालयासाठी आरक्षित भूखंडावरील विस्थापितांसाठी द्यावे लागणारे ३१ कोटी ७५ लाख रुपयांचे शुल्क माफ. याठिकाणचे विस्थापितांचे अनिवासी व निवासी गाळे सार्वजनिक बांधकाम विभागास निशुल्क हस्तांतरीत होणार. (सार्वजनिक बांधकाम विभाग) पिंपरी - चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील मौ. चिखली येथील दफनभुमी च्या १ हेक्टर ७५ आर क्षेत्रापैकी ४०% क्षेत्र (७००० चौ.मी.) मैला शुध्दीकरण केंद्रासाठी वापरण्यास मंजुरी. (नगर विकास विभाग) महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजनेंतर्गत हडको संस्थेकडून घेण्यात येणाऱ्या २ हजार कोटींच्या कर्जास शासन हमी देण्याचा, त्यापोटीचे हमी शुल्क माफ करण्याचा निर्णय. यात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा प्रकल्पाच्या हिश्श्यापोटीचे ८२२ कोटी २२ लाख, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या चार मलनिःसारण प्रकल्पासाठी २६८ कोटी ८४ लाख रुपये व मिरा-भाईंदर महापालिकेच्या पाणी पुरवठा प्रकल्पाच्या हिश्श्यापोटीच्या ११६ कोटी २८ लाख रुपयांच्या मागणीचा समावेश. (नगरविकास विभाग)

### वारीसंदर्भात केलेल्या

सेक्शन दहा प्रमाणे नोटीस बजावत कारवाईचा इशारा देखील दिला होता. ज्यामुळे हे प्रकरण अंगलट येईल या भीतीने, आता अबू आझमी यांनी आपल्या वक्तव्यावर माफी मागितली आहे. त्यांनी सोशल मीडियावर म्हटले की, माझ्या वक्तव्यामुळे गैरसमज पसरवण्यात आले. माझे वक्तव्य तोडून मोडून दाखवले गेले. माझ्या वक्तव्यामुळे वारकरी संप्रदायाच्या भावनांना ठेच पोहचली असेल तर मी माझे शब्द मागे घेतो. मी त्यांची जाहीर माफी मागतो. कोणाच्याही धार्मिक भावना दुखवण्याचा माझा हेतू नव्हता, असे आझमी यांनी म्हटले आहे. ''मी नेहमीच प्रत्येक धर्म, संस्कृती, सुफी संत आणि त्यांच्या परंपरांचा आदर करतो. वारी परंपरेचे पालन करणाऱ्या सर्व वारकरी बांधवांना मी मनापासून शुभेच्छा देतो आणि त्यांच्याबद्दल आदर व्यक्त करतो. वारीची परंपरा महाराष्ट्राच्या आंतरधर्मीय, समृद्ध सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारशाचा अभिमानास्पद भाग आहे. मी पालखीचा उल्लेख फक्त मुस्लिम समुदायाविरुद्ध होणाऱ्या भेदभावाच्या आणि त्यांच्या हक्कांच्या संदर्भात केला होता. मी कोणत्याही प्रकारची तुलना केली नव्हती. माझा हेतू आणि माझी मागणी कोणत्याही प्रकारे अयोग्य नव्हती. सरकारचे लक्ष वेधण्यासाठी मी तसे म्हटले होते. अल्पसंख्याक समुदायाच्या मनात या देशात वेगवेगळे कायदे आहेत, अशी भावना निर्माण होऊ नये, हा माझा हेतू होता, असे आझमी यांनी म्हटले.

### अजित पवारांच्या खात्याकडे

या भेटीमध्ये निधी वाटपावरुन चर्चा झाल्याची माहिती आहे. अजित पवार आपल्याला निधी देत नाही अशी तक्रार करत शिवसेनेच्या मंत्र्यांनी या आधीही नाराजी व्यक्त केली आहे. शिवसेनेच्या मंत्र्यांनी या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचीही भेट घेतली होती. परंतु निधी हा काही आपल्या खिशातून देत नाही, राज्याच्या तिजोरीला शिस्त आणण्यासाठी काही पावले उचलली जातात असं अजित पवारांनी या आधी स्पष्ट केलं होतं.अजित पवारांच्या निधी वाटपावर फक्त शिवसेनेच्याच नव्हे तर भाजपच्या आमदारांनीही नाराजी व्यक्त केली आहे. अमित शाह नांदेडच्या दौऱ्यावर असताना भाजपच्या आमदारांनी त्यांच्याकडे स्टेजवरच तक्रार केली होती.

### पंढरीला निघालेल्या भोळ्याभाबड्या

तेव्हा प्रवेशद्वारावर स्कॅनिंग करताना ते पास बोगस असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर मंदिर प्रशासनाने तात्काळ कारवाई करत या सात भाविकांना बाजूला घेऊन चौकशी सुरू केली. मात्र, त्यांना हे पास कोणी तयार करून दिले? याबाबत माहिती सांगता आली नाही आले नाही. त्यानंतर प्रशासनाने या भाविकांना पोलिसांकडे पाठवले असून बोगस पास रॅकेट उघड करण्याचे आव्हान आता पोलिसांसमोर असणार आहे.

## प्रत्येक तासाला कोट्यवधींची कमाई, एका दिवसात अब्जाधीश होतात गौतम अदानी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींच्या यादीत गौतम अदानी यांचे देखील नाव आहे. अमेरिकेतील न्यायालयाच्या एका निर्णयामुळे अदानी समूहाच्या शेअर्समध्ये मोठी विक्री झाली आहे. आशिया आणि भारतामध्ये मोठा प्रभाव असणाऱ्या गौतम अदानी यांना २ वर्षांमध्ये शेअर्समध्ये दुसरा सर्वात मोठा धक्का बसला आहे. कारण गौतम अदानी यांच्या शेअर्समध्ये मोठ्या प्रमाणात घसरण झाली आहे. जानेवारी २०२३ मध्ये सुरुवातीला हिंडनबर्गच्या रिपोर्टनुसार, अदानी समूहाचे शेअर्स हे मोठ्या प्रमाणात घसरले होते.

फोर्बसच्या रिपोर्टनुसार, गौतम अदानी हे भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात श्रीमंत व्यक्ती आहेत. त्यांची एकूण संपत्ती ११६ अब्ज डॉलर्स म्हणजे (९.७० लाख कोटींहून) अधिक आहे.

त्याच वेळी, हुरुन इंडिया रिच लिस्टनुसार गौतम अदानी आणि त्यांच्या कुटुंबाने गेल्या ५ वर्षांमध्ये सर्वाधिक संपत्ती मिळवली आहे. अदानी ब्लेंचर्सने गेल्या ५ वर्षात ऊर्जा क्षेत्रात १०,२१,६०० कोटी रुपयांची कमाई केली. यामुळे त्यांच्या संपत्तीत मोठा बदल झाला आहे. गेल्या ५ वर्षात भारतातील सर्वात मोठ्या अब्जाधीशांची एकूण संपत्ती १० लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहे.

## देवेंद्र फडणवीसांनी महत्त्वाचा आदेश काढला, मंत्र्यांच्या स्वीय सहाय्यकांना मूळ विभागात जाण्यासाठी अल्टिमेटम, अन्यथा कठोर कारवाईचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील महायुती सरकारमध्ये असणाऱ्या भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तीन पक्षांमधील कुरबुरी अधूनमधून समोर येत असतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्र्यांच्या कार्यालयातील स्वीय सहायक आणि ओएसडींच्या नियुक्तिसंदर्भात घेतलेल्या कठोर भूमिकेवरुन महायुतीमध्ये काहीशी नाराजी आहेत. अशातच आता मुख्यमंत्री कार्यालयाकडून मंत्र्यांच्या खासगी सचिवांना त्यांच्या मूळ विभागात जाण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मुख्यमंत्री कार्यालयाकडून यापूर्वीच संबंधित स्वीय सहाय्यकांना हे आदेश तोंडी देण्यात आले होते. मात्र, त्याच्याकडे मंत्री आणि त्यांच्या पीए यांनी कानाडोळा केला होता. मात्र, आता मुख्यमंत्री कार्यालयाकडून मंत्र्यांच्या स्वीय सहाय्यकांना तातडीने त्यांच्या मूळ विभागात रुजू होण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामुळे महायुती सरकारच्या मंत्र्यांची धाकधूक वाढली आहे. यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुती सरकारमधील सात मंत्र्यांना ओएसडी आणि पीए नियुक्त करण्यासाठीची परवानगी नाकारली होती. हा विषय अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. परंतु, आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयाकडून पुन्हा एका मंत्र्यांचे पीए म्हणून कार्यरत असलेल्या सरकारी अधिकाऱ्यांना त्यांच्या मूळ विभागात रुजू होण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हा आदेश मिळाल्यानंतरही मूळ विभागात हजर न झाल्यास संबंधित सरकारी अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली जाईल.

या आदेशामुळे महायुतीमधील मंत्र्यांची एकच तारांबळ उडाली आहे. स्वीय सहाय्यक आणि ओएसडी हे मंत्र्याच्या अत्यंत जवळचे आणि विश्वासातील असतात. त्यामुळे मंत्री या पदावरील अधिकाऱ्यांची निवड करताना आपल्या मर्जीतील अधिकाऱ्यांची वर्णी लागावी, यासाठी आग्रही असतात. परंतु, देवेंद्र फडणवीस हे पीए आणि ओएसडींची नेमणूक करताना त्यांचे चारित्र्य निष्कलंक असावे, यासाठी आग्रही आहेत. तसेच काही अधिकारी एकाच विभागात अनेक वर्षे सचिव म्हणून कार्यरत आहेत. यामुळे त्यांची एकाधिकारशाही निर्माण होण्याचा आणि भ्रष्टाचाराचा धोका असू शकतो. यामुळे देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने वर्षानुवर्षे एकाच मंत्र्याकडे सचिव म्हणून कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांना आपल्या मूळ विभागात रुजू होण्याचे आदेश दिले होते. यासंदर्भात देवेंद्र फडणवीस यांनी आता आणखी कठोर भूमिका घेतली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, देवेंद्र फडणवीसांच्या आदेशामुळे नाराज असलेले सातपैकी पाच मंत्री हे शिंदे गटाचे आहेत. यामध्ये संजय राठोड, गुलाबराव पाटील, उदय सामंत आणि शंभूराज देसाई यांचा समावेश आहे. तर राष्ट्रवादीच्या दोन मंत्र्यांचा आणि भाजपच्या एका मंत्र्याचा समावेश आहे. भाजपच्या मंत्र्यांनाही जवळचा सरकारी अधिकारी खासगी सचिव म्हणून हवा आहे.

## जुन्नरमध्ये श्रीगोंद्याचे तलाठी अन् कॉलेज तरुणीची सापडली बॉडी, रिव्हर्स वॉटर फॉलजवळ सोडल्या चपला

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे जिल्ह्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. जुन्नर तालुक्यामधील आदिवासी भागातील दुर्गावाडी येथे असलेल्या कोकणकडा परिसरातील सुमारे १२०० फूट खोल दरीत दोन जणांचे मृतदेह आढळून आले आहेत. या घटनेने पुणे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली.



कोकणकडा येथून या दोघांनी आत्महत्या केल्याचे प्राथमिक तपासातून वर्तवण्यात आलं आहे. मृतामध्ये श्रीगोंद्याचे तलाठी आणि एका महाविद्यालयीन तरुणीचा समावेश आहे. यामुळे आता या दोघांनी टोकाचं पाऊल का उचललं असावं याबाबतचे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

श्रीगोंद्याचे तलाठी रामचंद्र साहेबराव पारधी, (वय ४० वर्ष) असं मृत व्यक्तीचं नाव आहे. तर रुपाली संतोष खुटाण आंबोली (ता. जुन्नर) असं मृत महाविद्यालयीन तरुणीचं नावं आहे. जुन्नर पोलिस निरीक्षक किरण अवचर यांनी या घटनेबाबतची माहिती दिली आहे. जुन्नर पोलिस आणि रेस्क्यू टीमने कठिण परिस्थितीत मृतदेह दरीतून बाहेर काढले आहेत. दोघेही बेपत्ता असल्याची तक्रार त्यांच्या कुटुंबातील सदस्यांकडून पोलिस देण्यात आली होती अशी माहिती देखील समोर आली आहे.

काय आहे नेमकं प्रकरण?

पोलिसांकडून या घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, रामचंद्र पारधी हे मूळचे दुर्गावाडी येथील असून, अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यात ते तलाठी म्हणून कार्यरत होते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून ते बेपत्ता झाले होते, ते बेपत्ता असल्याने त्यांच्या पत्नीने अहिल्यानगरच्या तोफखाना पोलिस ठाण्यात तक्रार देखील नोंदवली होती. याशिवाय रूपाली देखील काही दिवसांपासून बेपत्ता होती. तिच्या अपहरणाचा गुन्हा जुन्नर पोलिस ठाण्यामध्ये दाखल करण्यात आलेला होता.

जुन्नरच्या रिव्हर्स वॉटर फॉलजवळ पांढऱ्या रंगाची कार काही दिवसांपासून उभी असल्याचे स्थानिक ग्रामस्थांना दिसले. यानंतर शोधाशोध केली असता, दरीच्या कठड्याच्या टोकावर पुरुष आणि स्त्रीच्या चपला आढळून आल्या होत्या. रविवारी (२२ जून) रोजी दाट धुके, पाऊस आणि अंधारामुळे शोधकार्य थांबवण्यात आले होते. काल (सोमवारी २३ तारखेला) सकाळी रेस्क्यू टीमने दरीत उतरून सर्वत्र शोध घेतला असता, रूपाली आणि रामचंद्र यांचे मृतदेह आढळून आले. त्यानंतर रेस्क्यू टीमने त्यांचे मृतदेह बाहेर काढले.

जुन्नर रेस्क्यू टीमचे रूपेश जगताप, राजकुमार चव्हाण, आणि पोलिस कर्मचारी रघुनाथ शिंदे, गणेश शिंदे, दादा पावडे यांनी मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी श्री शिवछत्रपती ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत. या प्रकरणाचा अधिक तपास जुन्नर पोलिस करत आहेत. या घटनेनं परिसरात खळबळ उडाली आहे.

## आपल्या गावात प्रयोग करता येत नाही याचं खूप वाईट वाटतं - संकर्षण कऱ्हाडे

दैनिक आपला विदर्भ

**परभणी/प्रतिनिधी :** मराठी अभिनेता संकर्षण कऱ्हाडेनं सोशल मीडिया पोस्टद्वारे आपल्या गावात आपण लिहिलेलं नाटक, करता येत नाही अशी खंत व्यक्त केली होती. यानंतर परभणीचे नाट्यगृह हे उकिरडा झाल्याचं संकर्षण कऱ्हाडेनं म्हटलं होतं. परभणीतील नटराज रंगमंदिरात अनेक दिग्गज अभिनेत्यांनी प्रयोग केले आहेत, आता तिकडे प्रयोग होत नाही याची खंत वाटत आहे, मंगलकार्यालयचे मानधन हे नाट्य संस्थेला परवडत नाही एकेकाळी परभणीचे नाट्यनागरी इकडच्या लोकांनी फुलवली होती, तरी आता त्यांचं पुढं काही होत नाही याबद्दल खूप वाईट वाटत असल्याचं संकर्षण कऱ्हाडे यांनी सांगितलं होतं.

त्यांनी पुढं म्हटलं, ''मी मुंबईहून काल रात्री निघालो कुटुंब कीर्तन नाटकाचा आज नांदेडमध्ये प्रयोग आहे, हे आमचं व्यावसायिक नाटक आहे. त्याचे आता ५० पेक्षा जास्त प्रयोग झाले आहेत. प्रशांत दामले फॅन फाऊंडेशनची निर्मिती आहे, मी स्वतः ते नाटक लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. मी नाटकात अभिनेता पण आहे, या नाटकामध्ये वंदना गुप्ते, तनवी मुंडले, अमोल कुलकर्णी आहेत. मी काम करतो तर मुंबईवरून नांदेडकडे येताना परभणी रेल्वे स्टेशन लागते. परभणीच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला देशभरात नाट्यप्रयोग करून देखील मी जिथे घडलो तिथे नाटकाचे प्रयोग सुरू केले, आता त्याच परभणीत मला नाट्य प्रयोग करता येत नाही. याची खंत वाटली खूप चांगल्या चांगल्या कलाकारांची यादी परभणी नगरीत आहे, लेखक दिग्दर्शक आणि अभिनेते आहेत. परभणी एक समृद्ध शहर आहे सर्व बाबतीत तर, अशा शहराच्या बाबतीत तिथल्या नाट्यमंदिर उकिरडा बनल जावा अशी अवस्था आहे. कलाकार म्हणून मनाला वाटणारी फार मोठी खंत आहे. हे खंत मी आज व्यक्त केली माझं कुणावर आरोप नाही. कलाकारांना कला मंदिर महत्त्वाचं आहे. कला मंदिर मिळावं ते चांगलं असावं त्याची अवस्था छान असावी त्याचा गैरवापर होऊ नये, त्यामध्ये लक्ष घालावं अगदी एवढीच मागणी आहे. परभणीमधून मुंबईला गेलेल्या या कलाकाराचा पुन्हा परभणीत प्रयोग व्हावा एवढीच नम्र इच्छा आणि प्रार्थना आहे.

# मजूराच्या मुलीची नीट परिक्षेत यशस्वी भरारी

## हुजैफाचे डॉक्टर बनण्याचे स्वप्न होणार साकार !

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** मोल मजुरीचे हाताला मिळेल ते काम करून आपल्या मुलीला उच्चशिक्षित करण्याचे ध्येय बाळगणाऱ्या शेख जमीर यांची मुलगी कुमारी हुजैफा तहेरीन हिने यंदाच्या नीट परीक्षेत ४८२ गुण मिळवून वडिलांचे स्वप्न साकार केले आहे.

स्थानिक गोपिकाबाई गावंडे महाविद्यालय बारावीचे शिक्षण पूर्ण करून एम पी एस अकॅडमीच्या माध्यमातून तिने आपला उच्चशैक्षणिक प्रवास सुरू केला . व डॉक्टर बनण्याचे ध्येय्य गाठले कुमारी हुजैफा हिनेनीट परीक्षेत ४८२ गुण मिळविले तिची ऑल इंडिया रँक ७४३९८ आणि ई डब्ल्यू एस कॅटेगिरी रँक ९२५१ आहे .शहरातील नामांकित एम पी एस अकॅडमी मधून तालुक्यातून ती प्रथम आली आहे .अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत तिने एकाग्रचित्ताने सतत अभ्यास करून जिद्दीने यशोशिकराकडे मार्गक्रमण करीत असल्याने हुजैफाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



# वाशीम जिल्ह्यातील सर्वच ग्रामपंचायतींची होणार तपासणी

## जि. प. सीईओ वैभव वाघमारे यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत केंद्र शासनाच्या वतीने स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५ या उपक्रमास सुरुवात झाली आहे. याअंतर्गत वाशिम जिल्ह्यातील ४९१ ग्रामपंचायती अंतर्गत ६८१ गावांमध्ये स्वच्छता विषयक तपासणी होणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी दिली आहे.

स्वच्छ सर्वेक्षण ग्रामिण मध्ये गावांतील स्वच्छतेची प्रत्यश्व पाहणी केली जाणार असून त्यामध्ये वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांचा वापर, दृष्यमान स्वच्छता, ओला-सुका कचऱ्याचे वर्गीकरण, घनकचरा आणि सांडपाणी व्यवस्थापन, खतखड्डे, प्लास्टिक संकलन व त्याचे व्यवस्थापनाची पाहणी करण्यात येणार आहे. यादरम्यान घरोघरी भेट देऊन नागरिकांच्या स्वच्छतेविषयक सवयी, शौचालय वापर, कचरा व्यवस्थापन, हात धुण्याच्या सवयी, तसेच परिसरातील एकूण स्वच्छतेचा आढावा घेतला जाईल. यासोबतच शाळा, अंगणवाडी, बाजारपेठा, धार्मिक स्थळे आणि सार्वजनिक शौचालये या सारख्या सार्वजनिक संस्थांमध्ये स्वच्छता राखलेली आहे का, याचीही पडताळणी केली जाणार आहे. या सर्वेक्षणाला सर्व सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, पाणीपुरवठा समित्या आणि ग्रामस्थांनी एकजुटीने सामोरे जावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक श्रीराम कुळकर्णी, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आत्माराम बोंदरे, ग्रामिण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अजिंक्य वानखडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग ठोंबरे, प्राथमिक शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे, महिला व बाल विकास विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी संजय गणविर यांनी केले आहे.

### या विभागांचा समावेश

स्वच्छ सर्वेक्षण ग्रामिण हा केवळ स्वच्छता विभागाशी संबंधीत नुसुन त्यामध्ये पंचायत विभाग, शिक्षण, आरोग्य, एकात्मिक बाल विकास विभाग, पाणी पुरवठा या विभागांचा समावेश आहे. त्यामुळे केंद्रीय पथकाच्या माध्यमातुन गावात तपासणी होत असतांना सर्व विभागांनी आपापसात समन्वय ठेवणे अपेक्षित आहे.

### १००० गुणांच्या आधारे होणार मूल्यांकन

या सर्वेक्षणासाठी एकूण १००० गुणांची मूल्यांकन पद्धती निश्चित करण्यात आली आहे, ज्यामध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन १२० गुण, ग्रामस्थांचा प्रतिसाद व मानसिकतेतील बदल-१०० गुण, स्वच्छता सुविधांचा वापर-२४० गुण व प्रत्यक्ष निरीक्षण व प्रश्नावली-५४० गुण असे एकूण १००० गुणाचे मुल्यांकन राहणार आहे.

## विविध वृत्त...

### सोईट ग्राम पंचायतने जि. प. प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळेत शिक्षण घेणारे विदयार्थीच्या घराचे एक वर्षाचे कर केले माफ

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** आज पालकांची आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत टाकण्याची मानसिकता अशी झाली आहे की, माझा मुलगा किंवा मुलगी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत टाकल्यास चांगली नोकरी मिळू शकते, इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये चांगली सुविधा आणि शिक्षण मिळते, काही पालक शहरी भागांप्रमाणेच ग्रामीण भागातही, आपले मूल इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकलेले हवे असते, त्यामुळे जिल्हा परिषद शाळांकडे दुर्लक्ष केले जाते. तर काही पालक इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुलांना टाकले म्हणजे आपली सामाजिक प्रतिष्ठा वाढते या गैर समज मध्ये असतात यामुळे पालक जास्त इंग्रजी माध्यमाच्या शाळेला प्राधान्य देतात म्हणून आज शहरी आणि ग्रामीण जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थी संख्या कमी होत असून या इंग्रजी शाळेचा फटका मात्र गरीब वर्गाला बसत आहे. जिल्हा परिषद शाळे मध्ये विदयार्थी संख्या कमी होत असल्यामुळे बऱ्याच जिल्हा परिषद शाळा बंद होण्याचा मार्गावर आहे. यामुळे गरीब वर्गाला इंग्रजी शाळेत शिक्षण घेणं परवडणार नसल्याने गरीब वर्ग अशिक्षित राहणार असल्याचे चित्र उभे टाकले आहे. अशाच परिस्थितीत आज सोईट सारख्या ग्रामपंचायत ची आवश्यकता आहे. सोईट ग्रामपंचायत ने जिल्हा परिषद शाळा वाचवण्यासाठी ठराव घेऊन ग्राम पंचायत सोईट (म) येथील जि. प. प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळेत शिक्षण घेणारे विदयार्थी यांचे २०२५/२६ चे घर टॅक्स व नळ टॅक्स पूर्ण पणे माफ केले असून ज्या पाल्य जि.प. प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळा सोईट (म) येथे नव्याने प्रवेश घेतील त्यांचा सुद्धा घर टॅक्स व नळ टॅक्स पूर्ण पणे माफ केले जाईल अशा ठराव घेतल्यामुळे जि.प. प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळा सोईट येथे शाळेत विध्यार्थी संख्या वाढण्यास मदत होऊन शाळा बंद पडणार नाही.

### माळेगावच्या निवडणुकीत कोणाला दगाफटका झाला? क्रॉस व्होटिंगने मतमोजणीत ट्विस्ट

**माळेगाव/प्रतिनिधी :** बारामतीतील माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणूकीच्या मतमोजणीत आतापर्यंतच्या आढाव्यानुसार मोठ्याप्रमाणावर क्रॉस व्होटींग झाल्याचे पहायला मिळत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार स्वत: जरी ब गटातून निवडून आले असले तरी इतर गटांमधे अजित पवारांच्या नेतृत्वाखालील निळकंठेश्वर पॅनेलला चंद्रराव तावरे आणि रंजन तावरे यांच्या नेतृत्वाखालील सहकार बचाव पॅनेलच्या उमेदवारांकडून कडवी लढत पहायला मिळत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवारांनी सहकारी साखर कारखान्याची ही निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. त्यांनी या कारखान्याला ५०० कोटी रुपयांच्या आर्थिक मदतीची घोषणा केली होती. यानंतर अजितदादांनी पॅनेल टू पॅनेल मतदान करुन त्यांच्या निळकंठेश्वर या संपूर्ण पॅनेलला मतदान करण्याचे आवाहन मतदारांना केले होते. मात्र, मतदारांनी अजित पवारांच्या पॅनेल बरोबरच तावरेंच्या पॅनेलला देखील मतदान केल्याच प्रथमदर्शनी पहायला मिळत आहे.

या निवडणुकीत क्रॉस व्होटिंग झाल्याने निकाल काय लागणार, याबाबतची उत्सुकता आणखी वाढली आहे. हा निकाल लागण्यासाठी आणखी काही तासांचा अवघी लागेल. अजित पवार स्वत: ब गटातून निवडून आले असले तरी त्यांच्या पॅनलचे इतर उमेदवार निवडून येणार का, हे स्पष्ट होण्यासाठी आणखी काही तास वाट पाहावी लागणार आहे.

माळेगाव कारखाना पंचवार्षिक निवडणुकीची मतमोजणी रंगतदार अवस्थेत आहे. अजित पवार पॅनेलचे उमेदवार रतनकुमार भोसले हे सध्या आघाडीवर आहेत. त्यांनी अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातून निवडणूक लढवली होती. याच प्रवर्गातून रिंगणात असणारे बापूराव गायकवाड हे सध्या पिछाडीवर आहेत.माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह शरद पवारांचे जुने सहकारी चंद्रराव तावरे आणि शेतकरी संघटना अशी मिळून चार पॅनेल्स मैदानात आहेत. काहीवेळापूर्वीच या निवडणुकीचा पहिला निकाल हाती आला असून 'ब वर्ग गटातून' उपमुख्यमंत्री अजित पवार हे विजयी झाले आहेत. १०२ पैकी १०१ मतं वैध होती, यातील अजित पवारांना ९१ मतं मिळाली आहेत. सहकारी संस्था या गटासाठी मतदान करतात.

# अस्थि विसर्जना ऐवजी केला वृक्षारोपणाचा संकल्प

## एका पित्याला पुत्राची अनोखी श्रद्धांजली

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप



**बिबी :** सामान्यतः आपल्या प्रियजनांच्या निधनानंतर विसर्जन नदीत केले जाते. मात्र लोणार तालुक्यातील वझर आघाव येथील माजी लोकनियुक्त सरपंच रामेश्वर सिताराम आघाव संजय सिताराम आघाव शशिकांत सिताराम आघाव ज्योती ताई ताठे या चारही भावंडांनी आपले पिता सितारामजी पर्बतराव आघाव यांच्या अकाली निधन नंतर त्यांच्या स्मरणार्थ एक अनोखा व पर्यावरण पुरक उपक्रम राबविण्याचा निर्णय त्यांनी घेतला. आपल्या वडिलांच्या अस्थि नदी मध्ये विसर्जित न करता त्या राखेचा उपयोग करून फळ झाडांची लागवड करण्याचा अनोखा निर्णय घेतला. आपल्या वडिलांच्या अस्थि झाडांच्या मुळाशी घालून वृक्षारोपण केले.वडिलांचे वय मृत्यू समयी ७८ वर्षाचे होते.त्यानुसार ७८ झाडांची लागवड करण्यात आली. हा भावनिक व प्रेरणादायी उपक्रम पार पडला.ही रोपे आता केवळ झाडे नसून वडिलांच्या स्मृतींना उजाळा देणारी जिवंत आठवण ठरली.या संकल्पा बाबत भावंडांनी म्हंटले नदी ही जिवनदायीनी आहे मंग का तीला का आपल्या मृतांची राख देऊन दुषीत करतो.या ऐवजी आम्ही भावंडांनी निर्णय घेतला की आमच्या वडिलांच्या अस्थिचा उपयोग एका नव्या जिवनासाठी व एका झाडाच्या संवर्धनासाठी करायचा या निमित्ताने त्यांचे झाडांच्या रुपाने नाव जिवंत राहिल.शिवाय तेरवीचा कार्यक्रम बंद ठेवण्याचा सुद्धा निर्णय घेतला.त्यांचा हा उपक्रम समाजसेवेचा आव आणणाऱ्या प्रत्येकासाठी आदर्शवत आहे. जल प्रदुषण वायुप्रदूषण रोखत आपल्या वडिलांची आठवण कायम ठेवण्याच्या या त्रिवेणी संगम निर्णयाचे समाजातून कौतुक होत असुन त्यांचे अनुकरण प्रत्येकाने करणे हिच वै.सितारामजी आघाव यांना खरी श्रद्धांजली ठरेल

# माजी फिरकीपटू दिलीप दोशी यांचे निधन!

**मुंबई/प्रतिनिधी :** भारताचे माजी फिरकीपटू दिलीप दोशी यांचे सोमवारी रात्री लंडन येथे निधन झाले. मृत्यूसमयी ते ७७ वर्षांचे होते. उत्कृष्ट फिरकी गोलंदाज आणि यशस्वी हिंदी क्रिकेट समालोचक म्हणून ते लोकप्रिय होते.

डावखुरे फिरकी गोलंदाज दोशी यांचे निधन हृदयविकारामुळे झाले. ईएसपीएनक्रिकइन्फोच्या मते, दोशी गेल्या अनेक वर्षांपासून लंडनमध्येच राहत होते. त्यांच्या पश्चात पत्नी कालिंदी, मुलगा नयन आणि मुलगी विशाखा असा परिवार आहे. त्यांचा मुलगा नयन इंग्लंडच्या कौंटी क्रिकेटमध्ये सरे आणि महाराष्ट्राच्या सौराष्ट्र संघाकडून खेळला आहे. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ८९८ बळी घेणाऱ्या दिलीप दोशी यांनी २३८ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये ४३ वेळा ५ बळी घेतले. एका सामन्यात ६ वेळा १० बळी घेण्याचा विक्रम केला होता.

भारतासाठी खेळण्याव्यतिरिक्त, दोशी यांनी देशांतर्गत क्रिकेटमध्येही आपले कौशल्य दाखवले. त्यांनी सौराष्ट्र आणि बंगाल संघाकडूनही क्रिकेट खेळले. याशिवाय, परदेशी कौंटी क्रिकेटमध्ये दोशी यांनी वॉर्विकशायर आणि नॉटिंगहॅमशायरसाठी प्रथम श्रेणी क्रिकेट खेळले होते. अलीकडेच बीसीसीआयने एका समारंभात दोशी यांचा सन्मानही केला होता. या महिन्याच्या सुरुवातीला लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर झालेल्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यातही ते उपस्थित होते. दोशी यांनी वयाच्या ३२ व्या वर्षी क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या दिलीप दोशी यांची आंतरराष्ट्रीय कारकीर्द फार मोठी नव्हती. त्यांनी १९८० च्या दशकात आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा म्हटले. दोशी यांनी आपल्या 'स्पिन पंच' या आत्मचरित्रात आपल्या क्रिकेट कारकिर्दीबद्दल सविस्तर लिहिले आहे.

दोशी यांच्या निधनावर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) दोशी यांच्या फोटोसह सोशल मिडीयात त्यांच्या निधनाची बातमी शेअर करत श्रद्धांजली अर्पण केली आहे. यासोबतच सौराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने देखील दोशी यांच्या निधनावर शोक व्यक्त केलाय.

# जिल्हा परिषद शाळा टिकवण्यासाठी शैक्षणिक दर्जा उंचावण्याची गरज

## माजी मंत्री सुबोध सावजी यांचे शासनाच्या धोरणावर टीका

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा २३ जून पासून सुरू झालेल्या आहेत. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत करण्यात आले आहे. लोकप्रतिनिधी, अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद शाळेत उपस्थिती लावून विद्यार्थ्यांचे स्वागत केले ही अत्यंत आनंदाची बाब आहे. मात्र, केवळ स्वागत करून किंवा लोकप्रतिनिधींनी हा इव्हेंट करून आपली प्रसिद्धी मिळवण्यापुरता मर्यादित न राहता जिल्हा परिषद शाळांचा शैक्षणिक दर्जा उंच व्हावा, शाळांमध्ये सोयी-सुविधा उपलब्ध करून द्यावा उच्च शिक्षण घेतलेले शिक्षकांची नियुक्ती करावी, असे मत माजी मंत्री सुबोध सावजी यांनी व्यक्त केले.जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रवेशोत्सवावर प्रतिक्रिया देताना ते बोलत होते.

यावेळी ती म्हणाले की, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये लोकप्रतिनिधीने हजेरी लावून विद्यार्थ्यांचे पहिल्या दिवशी स्वागत केले आहे. अधिकारी पदाधिकाऱ्यांसाठी हा इव्हेंट ठरला आहे. मंत्री, आमदार, लोकप्रतिनिधी, अधिकारी यांनी शाळेमध्ये हजेरी लावत विद्यार्थ्यांचे स्वागत केले आहे. काही ठिकाणी विद्यार्थ्यांची बैलगाडीमध्ये बसून प्रभात फेरी काढण्यात आली. काही ठिकाणी विद्यार्थ्यांच्या अंगावर पुष्पवृष्टी करण्यात आली. पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. हा सर्व प्रकार लोकप्रतिनिधीसाठी प्रसिद्धीचा इव्हेंट ठरू नये, आज रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत अनेक समस्या आहेत. शिक्षक नाहीत, प्राथमिक सोयीसुविधा नाहीत. शाळेमध्ये शिपाई नाही, खेळण्यासाठी मैदान नाही,शौचालयाची व्यवस्था नाही, पिण्याची पाणी नाही, आदी अनेक समस्या असताना केवळ एक दिवस शाळेत जाऊन किंवा विद्यार्थ्यांना कडेवर घेऊन शैक्षणिक दर्जा उंचावणार नाही.



अधिकारी लोकप्रतिनिधींच्या मुले हे इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत आणि हेच लोक गोरगरिबांच्या मुलांना मराठी शाळेत येण्याचे आवाहन करीत आहेत. काही गावांनी तर, पाणीपट्टी, घरपट्टी माफ करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यावरून शैक्षणिक दर्जा हा किराणा दुकानासारखा झाला की काय असा प्रश्न निर्माण होत आहे. एक फ्री द्यायचं आणि एकाचे पैसे घ्यायचे. अशातला हा प्रकार आहे. आज रोजी ग्रामीण भागातील शाळांची अत्यंत दयनीय अवस्था आहे. आदिवासी भागातील शाळांमध्ये तर न पाहावली जाणारी स्थिती आहे. नागेशवाडी येथील वर्ग चार आणि एकच खोली आणि दोन शिक्षक या विद्यार्थ्यांना शिकवत असल्याचे विदारक चित्र मला दिसून आले आहे.त्यामुळे लोकप्रतिनिधींनी केवळ हा शैक्षणिक इव्हेंट करून प्रसिद्धी घेता जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये आवश्यक सोयीसुविधा, जिल्हा परिषद शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करावे, असे मत माजी मंत्री सुबोध सावजी यांनी शाळा प्रवेशोत्सव याबाबत बोलताना व्यक्त केले.

## राजगड, तोरणा किल्ल्यांसह या पर्यटनस्थळांवर बंदी

**पुणे/प्रतिनिधी :** कोकण आणि घाट परिसरात गेल्या काही दिवसांत पावसाचा जोर कायम आहे. सध्या पावसाळी पर्यटनासाठी अनेकजण डोंगरी किल्ले आणि सह्याद्रीतील निसर्गरम्य ठिकाणी जात असतात. पुणे जिल्ह्यातील डोंगराळ भागात मुसळधार पाऊस सुरू असून दरड कोसळण्याचा आणि निसरड्या रस्त्यांमुळे अपघाताचा धोका वाढला आहे. या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हा प्रशासनाने मोठा निर्णय घेतला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून राजगड, तोरणा, मढेघाट तसेच विविध धरण परिसरात पर्यटकांच्या प्रवेशावर बंदी घालण्यात आली आहे.पुणे जिल्ह्यातील राजगड, तोरणा, मढेघाट तसेच विविध धरण परिसरात पर्यटकांना बंदी करण्यात आली असून ही बंदी तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आली आहे. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत हे पर्यटकांसाठी बंदीचे आदेश लागू राहणार आहेत.सदर पर्यटनस्थळांवर दरवर्षी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी होते. मात्र, यंदा अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी रस्ते खराब झाले आहेत. पायवाट निसरड्या झाल्या आहेत आणि काही भागांत भूस्खलनाची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे जीवितहानी टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून ही बंदी लावण्यात आली आहे, असे भोरचे उपविभागीय अधिकारी डॉ. विकास खरात यांनी सांगितले.

# जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या वाढविण्यासाठी पिंप्री खंदारे ग्रामपंचायतीचा अनोखा ठराव पारित

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** खासगी इंग्रजी शाळांकडे वाढलेला कल पाहता अनेक पालकांनी जिल्हा परिषद शाळेकडे पाठ फिरवली आहे जिल्हा परिषद शाळेतील पटसंख्या दिवसेंदिवस घटत चालली आहे शाळेची पटसंख्या टिकून ठेवण्यासाठी मौजे पिंप्री खंदारे येथील ग्रामपंचायतीने सर्व गावकऱ्यांच्या संमतीने अनोखी शक्कल लढवून जिल्हा परिषद शाळेत आपल्या पाल्यांना प्रवेशित करणाऱ्या पालकांना दिनांक १ जून २०२५ पासून पाणी व घरपट्टीत ५०% सूट देण्यात येणार असल्याचा ठराव पारित केला याबाबत ग्रामपंचायत सदस्य सौ.कमल अशोक पवार यांनी ही सूचना मांडली व सौ.सविता नरसिंह चौधर यांनी अनुमोदन दिले त्याला सर्व सदस्यांनी पाठिंबा दर्शवीला यासंदर्भात ग्रामपंचायत सरपंच.कमल चौधर,ग्रामपंचायत अधिकारी श्री. संदिप काळे यांनी ठराव संमत केला .

या शाळेने अनेक कोहिनूर घडविले आहेत याच शाळेत प्राथमिक मूळ पाया पक्का करून अनेक विद्यार्थ्यांनी नामांकित विद्यापीठांमध्ये व इतर राष्ट्रात शैक्षणिक प्रवेश मिळवून आपल्या स्वबळावर स्वतःची एक वेगळी छबी निर्माण केली आहे.

गावातील जिल्हा परिषद शाळेत पाल्यांना प्रवेश द्या आणि घरपट्टी (स्थानीय कर) ५०% माफीचा लाभ घ्या अशी योजनाच सुरू केली आहे. या निर्णयाची पंचक्रोशीत चांगलीच चर्चा रंगली आहे. पिंप्री खंदारे येथील ग्रामपंचायतीच्या नुकत्याच झालेल्या मासिक बैठकीत याबाबतचा ठराव



संमत करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया मजबूत व्हावा आणि शिक्षण म्हणजे केवळ ज्ञान संचयचं नव्हे तर संस्कारासह विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास गावातील जिल्हा परिषद शाळेमध्येच व्हावा यासाठी पिंप्री खंदारे येथील ग्रामपंचायत व श्री. गणेश उबाळे अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती शाळेत जातीने लक्ष घालणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.